"मराठी रंगभूमी कधीच मरणार नाही. योग्य दिशेने प्रयत्न केल्यास मराठी रंगभूमीची स्थिती अजूनही सुधारेल. कुलीन स्त्रियांनी नाटकात धंदा म्हणून काम करू नये."
**(गणपतराव बोडस, ३१ वे संमेलन, नाशिक)**

---

कलावंत जयमालाबाई, रजनी जोशी, निर्मला गोगटे, किर्ती शिलेदार यांची अदाकारी बघायला आजचा प्रेक्षक जाईल का? उत्कृष्ट गुणवत्ता आणि नैपुण्य असणाऱ्या पण कालौघात साठीकडे झुकलेल्या नायक/नायिकांना रंगभूमीवर पाहण्यासाठी प्रेक्षक नाटकाला गर्दी करतील का? अशा परिस्थितीत प्रेक्षकांनी संगीत रंगभूमीकडे झेप घ्यावी अशी अपेक्षा करणे योग्य होईल का? चंद्रलेखाचे मोहन वाघ ह्यांनी प्रचंड परिश्रमाने 'संगीत शतजन्म शोधिताना' हे संगीत नाटक रंगभूमीवर आणलं. त्या नाटकानंतर आजच्या प्रेक्षकांकडून स्पर्धा चालू केली. पहिल्या वर्षी फक्त पाच स्पर्धकांनी भाग घेतला आणि पुढे दोन वर्षे नो रिस्पॉन्स. नवीन संगीत एकांकिका करायला कुठलीही संस्था पुढाकार घेत नाही.

नाटकाचा व्यवसाय हा रेसच्या घोड्यासारखा आहे. रेसच्या घोड्यावर निदान व्यापाऱ्यांचा/ दोन नंबरचा पैसा मिळवणाऱ्यांचा पैसा असतो. पण नाटकासाठी अगदी व्याजानं पैसा आणला आणि ते नाटकच प्रेक्षकांनी अव्हेरलं, तर संपलंच नां! नाटक चालत नाही तर पैसा कुठून आणणार? तसा आपला दोन नंबरचा पैसा घालून काही मंडळी नाटकं काढतात, पण त्यात त्यांचा उद्देश मात्र काळा पैसा पांढरा करणं एव्हढाच असावा. त्यांना नाटकाविषयी प्रेम अजिबात नसतं, असलंच प्रेम तर ते त्या नाटकातील 'पात्रा'बद्दल असतं. शेवटी रंगभूमी हा एक मानवी जीवनातला व्यवहार आहे. आणि कितीही कलात्मकतेच्या, संस्कृतीच्या बाता मारल्या तरी हा व्यवहार आर्थिक दृष्ट्या सकस होणं आवश्यक आहे आणि त्यासाठी प्रामुख्यानं प्रेक्षकांची गर्दी उसळणं अत्यावश्यक आहे. त्यासाठी जी आकर्षकता रंगभूमीवर निर्माण झाली पाहिजे. नाटककार कितीही उच्च दर्जाचा असला, त्याला जे काही म्हणायचं आहे ते नाटकात मांडलं गेलं असलं, तरी प्रेक्षकांनी जर त्या नाटकाकडे पाठ फिरवली तर ते नाटक फक्त पुस्तकात राहीलं. याचाच अर्थ असा की संहितेतल्या मंत्रांनी प्रेक्षक मुग्ध आणि लुब्ध झाला पाहिजे. संस्कृतमध्ये असं एक सुभाषित आहे, ज्यात म्हटलंय की, ज्या थिएटरमध्ये प्रेक्षक नाहीत अशी थिएटर्स म्हणजे भिंती, चुना, रंग, विटा यांचं गोडाऊन!

परवाच एका प्रथितयश नटीला तिच्या नाटकाबद्दल विचारलं तेंव्हा ती म्हणाली "दाजी तुम्हाला एक सांगू का... आमच्या अंगात नाटक भिनतच नाही. पूर्वी नाटक झालं की त्याची धुंदी काही दिवस रहायची. एक तऱ्हेची नशा यायची/मजा यायची. आम्ही त्यामुळे फ्रेश व्हायचो. पण आता नाटक झालं की आम्ही दमून भागून घरी जातो." याचं कारण मला वाटतंय की नाटकाचे विषय कमी पडत असावेत किंवा त्याची मांडणी तरी कमी पडत असावी. प्रेक्षकांच्या हृदयाचा ठाव घेईल अशी जर नाटकाची मांडणी केली तर कदाचित रंगभूमी शंभरपटीनं फुलून येईल.

माझ्या भूमिका अतिशय गाजल्या, याला कारण माझा अभिनय. अभिनय करणं म्हणजे नटाला आणि प्रेक्षकांनासुद्धा सहज नैसर्गिक भासतील अशा प्रतिक्रिया प्रगट करणं. सुप्रसिद्ध नट पॉलमुनी म्हणत, कृत्रीमपणा न करता नट जेव्हा मुख्य आशयासह नाटकातील संबंधित घटना आपल्या व्यक्तिमत्वात मुरवून - जिरवून घेतो, समजून उमजून घेतो, शोषून घेतो त्याच वेळी तो प्रेक्षकांना दिलेल्या आनंद प्रदानानं स्वत:च